# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे - ०१

Website : www.mscepune.in Email: mscescholarship@gmail.com दूरध्वनी क्र. ०२०-२६१२३०६६/६७

**महत्वाचे / परीक्षा प्राधान्य**

जा.क्र.मरापप/शिष्यवृत्ती/२०१९/1011
दिनांक.- 06/02/2019.

## जाहीर प्रकटन

संदर्भ :- १) प्राचार्य, सैनिकी शाळा, सातारा यांचे पत्र क्र. NO. ५४५/S/EST/२०१८-१९/९५४, दि. ३०/०१/२०१९.
२) या कार्यालयाचे प्रसिध्दीपत्रक दि. ०५/०२/२०१९.

पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) फेब्रुवारी २०१९ आणि अखिल भारतीय सैनिकी शाळा प्रवेश पुनर्परीक्षा २०१९ या दोन्ही परीक्षा दि. २४/०२/२०१९ रोजी घेण्यात येणार आहेत. संदर्भ क्र. १ अन्वये प्राचार्य सैनिकी शाळा, सातारा यांनी सैनिकी शाळा प्रवेश पुनर्परीक्षेची तारीख तांत्रिक कारणांमुळे बदलणे शक्य नसल्याने शिष्यवृत्ती परीक्षेची तारीख बदलण्यास विनंती केली होती. त्यानुसार परीक्षार्थी दोन्हीपैकी कोणत्याही महत्त्वाच्या परीक्षांपासून वंचित राहू नये याकरीता परीक्षा परिषदेने शिष्यवृत्ती परीक्षेच्या वेळेत बदल करून संदर्भ क्र. २ अन्वये प्रसिध्दीपत्रक जाहिर केले आहे.

संपूर्ण महाराष्ट्रात अखिल भारतीय सैनिकी शाळा प्रवेश पुनर्परीक्षेची एकूण १२ परीक्षा केंद्रे आहेत. सदर दोन्ही परीक्षेस प्रविष्ठ परीक्षार्थ्यांपैकी एकूण १४८४ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी (PUP इ. ५ वी) प्रविष्ठ झालेले आहेत. या परीक्षार्थ्यांना दोन्ही परीक्षा देता याव्यात, यासाठी परीक्षा परिषदेने अखिल भारतीय सैनिकी शाळा प्रवेश पुनर्परीक्षेच्या १२ परीक्षा केंद्रांवरच सदर १४८४ परीक्षार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षेची सोय केलेली आहे. त्यामुळे सदर परीक्षार्थ्यांना अखिल भारतीय सैनिकी शाळा प्रवेश पुनर्परीक्षेच्या परीक्षा केंद्रांवरून शिष्यवृत्ती परीक्षेच्या केंद्रांपर्यंत प्रवास करण्याची आवश्यकता नाही. अखिल भारतीय सैनिकी शाळा प्रवेश पुनर्परीक्षेचा पेपर क्र. १ संपल्यानंतर त्याच केंद्रावर शिष्यवृत्ती परीक्षेचे त्यांचेकडे असलेले प्रवेशपत्र संबंधित केद्रसंचालकास दाखवून परीक्षार्थ्यास शिष्यवृत्ती परीक्षा देता येईल. तसेच सदर परीक्षार्थ्यांना अखिल भारतीय सैनिकी शाळा प्रवेश पुनर्परीक्षा द्यावयाची नसल्यास त्यांना त्यांच्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या मूळ परीक्षा केंद्रावरसुध्दा परीक्षा देता येईल असे नियोजन परीक्षा परिषदेकडून करण्यात आले आहे.

परीक्षा परिषदेने केवळ परीक्षार्थी हित पाहून महाराष्ट्र राज्यातील कोणताही परीक्षार्थी या दोन्ही महत्त्वाच्या परीक्षांपासून वंचित राहू नये अथवा परीक्षार्थ्यांची कोणतीही गैरसोय होऊ नये यादृष्टीने उपरोक्तनुसार परीक्षेचे नियोजन केलेले आहे.

(स्मिता गौड)
उपायुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ०१

स्थळ प्रत मा. आयुक्त यांनी मान्य केलेली आहे.

E:\KUNAL\2019\LETTER.docx

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - ०१

## प्रसिध्दीपत्रक

**संदर्भ** :- प्राचार्य, सैनिकी शाळा, सातारा यांचे पत्र क्र. NO. ५४५/S/EST/२०१८-१९/९५४, दि. ३०/०१/२०१९.

परीक्षा परिषदेमार्फत पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) दिनांक २४/०२/२०१९ रोजी महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये एकाच दिवशी घेण्यात येणार आहे. संदर्भीय पत्रान्वये अखिल भारतीय सैनिकी शाळा प्रवेश पुनर्परीक्षा ही सुध्दा दि. २४/०२/२०१९ रोजी घेण्यात येणार आहे.

उपरोक्त दोन्ही परीक्षा एकाच दिवशी येत असल्याने विद्यार्थ्यांना दोन्ही परीक्षा देता याव्यात याकरीता पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) **दि. २४/०२/२०१९ या दिवशीच होईल. तथापि परीक्षेच्या वेळेत खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.**

| दिनांक | पेपर क्र. | वेळ |
|---|---|---|
| २४/०२/२०१९ | पेपर क्र. १ | दु. ०१.०० ते दु. ०२.३० |
| | पेपर क्र. २ | दु. ०३.३० ते सायं. ०५.०० |

शिष्यवृत्ती परीक्षा व अखिल भारतीय सैनिकी शाळा प्रवेश पुनर्परीक्षा या दोन्ही परीक्षेस प्रविष्ट परीक्षार्थ्यांची परीक्षा त्यांचे मूळ परीक्षा केंद्र (शिष्यवृत्ती परीक्षेचे) व अखिल भारतीय सैनिकी शाळा प्रवेश पुनर्परीक्षेचे परीक्षा केंद्र अशा दोन्ही परीक्षा केंद्रांवर घेण्याची व्यवस्था परीक्षा परिषदेकडून करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर परीक्षार्थ्यांनी त्यांच्या सोयीनुसार दोन्हीपैकी एका परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्राच्या दोन प्रतींसह परीक्षेस उपस्थित राहून परीक्षा द्यावी. तरी सदर बदलाबाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(तुकाराम सुपे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ०१

दिनांक ०५/०२/२०१९